IIP: WJHSS
IIP
World Journal of Humanities and Social Sciences

An Online Peer-Reviewed / Refereed Journal
Vol: 02 No. Issue I, (January-March) (2026)
Impact Factor: IIFS: 5.75
ISSN: 3107-6661 (Online)

# सेनापती बापट यांचे भारताच्या जडणघडणीत राजकीय व सामाजिक योगदान : चिकित्सक अभ्यास

**[1]डॉ. औटी मेघराज एकनाथ, [2]स. प्रा. गणेश शेषराव शेळके**

[1]रा. ब. नारायण बोरावके कॉलेज, श्रीरामपूर, अहिल्यानगर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे.
[2]आर्ट्स कॉमर्स अँण्ड सायन्स कॉलेज शेवगाव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे.

**Article Info**

***Article History:***
Received: 20th February 2026
Accepted: 01st March 2026
Published: 07th March 2026

***Keywords:***
*सेनापती बापट, स्वातंत्र्य चळवळ, मुळशी सत्याग्रह, शेतकरी चळवळ, सामाजिक न्याय, राष्ट्रनिर्मिती*

**ABSTRACT**

भारतीय स्वातंत्र्य चळवळ ही केवळ राजकीय स्वातंत्र्याची लढाई नव्हती, तर ती सामाजिक न्याय, लोकशाही मूल्ये आणि सामान्य जनतेच्या न्याय हक्कांसाठी चाललेली व्यापक चळवळ स्वरुपाची होती. या चळवळीत अनेक थोर नेत्यांनी आपले योगदान दिले. त्यामधील एक महत्त्वाचे, परंतु तुलनेने कमी अभ्यासले गेलेले व्यक्तिमत्त्व म्हणजे सेनापती बापट)महादेव पांडुरंग बापट) प्रस्तुत संशोधन पेपरमध्ये सेनापती बापट यांच्या जीवनकार्याचा अभ्यास करून त्यांच्या राजकीय व सामाजिक योगदानाचे विश्लेषण करण्यात आले आहे. प्रारंभी त्यांनी सशस्त्र क्रांतीचा मार्ग स्वीकारला; पुढे महात्मा गांधी यांच्या शांततापूर्ण व सत्य व अहिंसक लढ्याचा प्रभाव सेनापती बापट यांच्यावर पडला. त्यांच्या प्रभावाखाली अहिंसक सत्याग्रहाचा मार्ग अंगीकारला विशेषतः मुळशी सत्याग्रह हा शेतकरी चळवळीतील मैलाचा दगड ठरला आहे. मुळशी सत्याग्रह चा लढा त्याठिकाणी होत असलेल्या प्रस्तावित धरण बांधकामाच्या विरोधात होता. या धरणामुळे मोठ्या प्रमाणावर शेती पाण्याखाली जाणार होती. त्यामुळे विस्थापीतांचे अनेक प्रश्न निर्माण झाले. यासंशोधन पेपरमध्ये बापटांच्या विचारसरणीचा, कार्यपद्धतीचा आणि भारताच्या राष्ट्रनिर्मिती प्रक्रियेत त्यांच्या योगदानाचा अभ्यास करण्यात आला आहे.

***Plagiarism Check Report:***
Date of Report: March 01, 2026
Similarity Index: 5%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2026 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite:** Auti, M. E., & Shelke, G. S. (2026). सेनापती बापट यांचे भारताच्या जडणघडणीत राजकीय व सामाजिक योगदान : चिकित्सक अभ्यास. *IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS)*, 2(I), 923–927.

**१ .प्रस्तावना Introduction :-**

भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास विविध प्रवाहांनी समृद्ध आहे .एका बाजूला सशस्त्र क्रांतिकारक चळवळी, तर दुसऱ्या बाजूलाराष्ट्रीय कांग्रेस व त्यातील जहाल व मवाळ चळवळ आहे त्याचसोबत महात्मा गांधींच्या नेतृत्वाखालील अहिंसक सत्याग्रहाचे आंदोलन दिसून येते .या दोन्ही प्रवाहांमध्ये सक्रिय सहभाग घेतलेले काही व्यक्तिमत्त्वे भारतीय इतिहासात महत्त्वाची ठरली आहेत .सेनापती बापट हे अशाच व्यक्तिमत्त्वांपैकी एक होत. सेनापती बापट यांचे योगदान केवळ स्वातंत्र्यलढ्यापुरते मर्यादित नव्हते, तर ते शेतकरी व कामगार वर्गाचे प्रश्न, सामाजिक समता, नैतिक राजकारण आणि लोकशाही मूल्यांच्या जोपासनेशी संबंधित होते. सेनापती बापट यांनी स्वातंत्र्य, सानाजिक न्याय, शेतकरी व कामगार वर्गाचे प्रश्न या विविध प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी व्यापक लढा उभारला होता. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य सामान्य जनतेच्या हक्कांसाठी अर्पण केले . त्यामुळे भारताच्या जडणघडणीच्या प्रक्रियेत त्यांच्या भूमिकेचा अभ्यास करणे अत्यंत आवश्यक ठरते.

**२ .संशोधनाची उद्दिष्टे Objectives of the Study :-**

१. सेनापती बापट यांच्या जीवन व कार्याचा अभ्यास करणे.
२. त्यांच्या राजकीय योगदानाचे विश्लेषण करणे.
३. त्यांच्या सामाजिक कार्याचा आणि शेतकरी चळवळीतील भूमिकेचा अभ्यास करणे.
४. भारताच्या राष्ट्रनिर्मितीत त्यांच्या योगदानाचे मूल्यांकन करणे.

**३ .संशोधन पद्धती Research Methodology :-**

प्रस्तुत अभ्यासासाठी ऐतिहासिक व वर्णनात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे .यासाठी पुढील साधनांचा वापर करण्यात आला आहे. प्रकाशित ग्रंथ, चरित्रे, संशोधन लेख, वृत्तपत्रीय लेख ,ऑनलाईन स्रोत

**४ .सेनापती बापट : जीवन व वैचारिक पार्श्वभूमी :-**

सेनापती बापट यांचा जन्म १२ नोव्हेंबर १८८० रोजी पारनेर येथे झाला.त्यांनी आपले [प्राथमिक शिक्षण आपल्या मूळ गावी घेतले. त्याननंतर पुढील शिक्षण त्यांनी पुणे याठिकाणी पूर्ण केले. शिक्षण घेत असतानाच त्यांनी विविध चळवळी वा आंदोलनात सहभाग घेतला. लहानपणापासूनच त्यांच्यात राष्ट्रभक्ती, स्वातंत्र्य, सामाजिक प्रश्न याविषयीत्यांची भावना दृढ होती . शिक्षणादरम्यानच त्यांनी ब्रिटिश सत्तेविरोधात असंतोष व्यक्त केला. पुढील काळात त्यांनी इंग्लंड व फ्रान्स येथेपुढील शिक्षण घेण्यासाठी वास्तव्य केले. तेथे त्यांनी युरोपातील क्रांतिकारक चळवळींचा अभ्यास केला आणि सशस्त्र क्रांतीच्या मार्गाकडे वळले. त्यासाठी ते पिस्तुल चालविणे शिकले. त्याचबरोबर सेनापती यांनी बॉम्ब बनविण्याचे प्रशिक्षण घेतल्याचे आढळते. मात्र, भारतात परतल्यानंतर सामाजिक वास्तवाची जाणीवनिर्माण झाली. आणि गांधीवादी विचारांचा प्रभाव यामुळे त्यांच्या विचारांमध्ये परिवर्तन झाले. त्यांनी हिंसक मार्गापेक्षाव सशस्र क्रांतिकारी चळवळीपेक्षा अहिंसक सत्याग्रह अधिक प्रभावी असल्याचे स्वीकारले.

**५ .राजकीय योगदान Political Contribution**

**५.१ प्रारंभीची क्रांतिकारक भूमिका :-**

सेनापती बापट हे सुरुवातीच्या काळात सशस्त्र क्रांतिकारक होते. त्यांनी ब्रिटिश सत्तेविरुद्ध सशस्त्र संघर्षाचा मार्ग स्वीकारण्याचा विचार केला होता. तसेच युरोपमध्ये असताना त्यांनी बॉम्बनिर्मितीचे तंत्र आत्मसात केले आणि ते भारतीय क्रांतिकारकांना शिकवले. ही बाब त्यांच्यामध्ये असलेल्या धाडसी आणि क्रांतिकारक वृत्तीचे द्योतक आहे.

**५.२ गांधीवादी चळवळीतील सहभाग :-**

सेनापती बापट) पांडुरंग महादेव बापट (हे भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील एक महत्त्वाचे नेतृत्व असून त्यांच्या जीवनातील

गांधीवादी टप्पा विशेष महत्त्वाचा आहे .सुरुवातीच्या काळात ते सशस्त्र क्रांतीच्या विचारांकडे झुकलेले होते .परदेशात शिक्षण घेत असताना त्यांनी क्रांतिकारक चळवळीशी संबंध ठेवला होता; मात्र भारतात परतल्यानंतर महात्मा गांधींच्या सत्य, अहिंसा आणि सत्याग्रह या तत्त्वांनी ते खोलवर प्रभावित झाले .गांधीजींच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्य मिळवण्यासाठी जनतेला व्यापक प्रमाणावर एकत्र आणण्याची क्षमता अहिंसक चळवळीत आहे, हे त्यांनी ओळखले आणि त्यानंतर त्यांनी गांधीवादी मार्ग स्वीकारला. त्यांनी १९२० साली सुरू झालेल्या असहकार चळवळीत सक्रिय सहभाग घेतला .त्यांनी ब्रिटिश सरकारशी सहकार्य न करण्याचा निर्णय घेतला आणि लोकांना सरकारी शाळा, न्यायालये व संस्थांचा बहिष्कार करण्याचे आवाहन केले .या चळवळीदरम्यान त्यांनी स्वदेशीचा पुरस्कार केला, खादीचा प्रसार केला आणि विदेशी वस्तूंच्या बहिष्कारासाठी जनजागृती केली .गांधीजींच्या कार्यक्रमानुसार स्वातंत्र्य ही केवळ राजकीय संकल्पना नसून ती सामाजिक व नैतिक परिवर्तनाशी जोडलेली आहे, ही भूमिका त्यांनी मांडली.

यानंतरच्या सविनय कायदेभंग चळवळीत सेनापती बापट यांनी ब्रिटिशांनी लादलेल्या अन्यायकारक कायद्यांचा अहिंसक पद्धतीने भंग केला .विशेषतः मिठाच्या कायद्याविरोधातील आंदोलनाला त्यांनी पाठिंबा दिला .या चळवळीतील सहभागामुळे त्यांना अनेक वेळा अटक झाली व दीर्घ काळ तुरुंगवास भोगावा लागला .तुरुंगात असतानाही त्यांनी आपली निष्ठा गांधीवादी विचारांशी कायम ठेवली आणि संयम, आत्मशुद्धी व त्याग या मूल्यांचा पुरस्कार केला.

गांधीवादी चळवळीचा एक महत्त्वाचा भाग म्हणून सेनापती बापट यांनी सामाजिक सुधारणांवर भर दिला .त्यांनी अस्पृश्यता निवारण, सामाजिक समता, साधे जीवन व सार्वजनिक नैतिकता यांचा आग्रह धरला .स्वातंत्र्यानंतरही त्यांनी लोकशाही, अहिंसा आणि समाजहित या तत्त्वांचे समर्थन केले .अशा प्रकारे सेनापती बापट यांचा गांधीवादी चळवळीतील सहभाग केवळ राजकीय आंदोलनापुरता मर्यादित न राहता, तो सामाजिक, नैतिक आणि वैचारिक परिवर्तनाशी जोडलेला होता, म्हणूनच त्यांचे योगदान भारतीय स्वातंत्र्यचळवळीत अत्यंत महत्त्वाचे मानले जाते.

## ६ .मुळशी सत्याग्रह : एक ऐतिहासिक चळवळ

### ६.१ मुळशी सत्याग्रहाची पार्श्वभूमी :-

१९२१ साली टाटा कंपनीकडून मुळशी धरण प्रकल्प राबविण्यात येत होता .या प्रकल्पामुळे शेकडो शेतकऱ्यांच्या जमिनी बुडीत जाणार होत्या व त्यामुळे शेतकरी बेघर व भूमिहीन होणार होते. त्याची शासन व कंपनीकडून योग्य भरपाई दिली जात नव्हती या अन्यायाविरोधात सेनापती बापट यांनी शेतकऱ्यांना संघटित केले.

### ६.२ सत्याग्रहाचे नेतृत्व :-

सेनापती बापटांनी अहिंसक मार्गाने शेतकऱ्यांचे प्रश्नसरकार समोर मांडले त्यांनी आंदोलनाचे नेतृत्व करताना प्रचंड त्याग केला .याच आंदोलनामुळे त्यांना “सेनापती” ही उपाधी शेतकरी यांच्याकडून मिळाली.

### ६.३ मुळशी सत्याग्रहाचे महत्त्व :-

मुळशी सत्याग्रह हा महाराष्ट्रातील तसेच भारतीय स्वातंत्र्यचळवळीतील एक अत्यंत महत्त्वाचा जनआंदोलनाचा अध्याय मानला जातो .१९२१ ते १९२५ या काळात पुणे जिल्ह्यातील मुळशी खोऱ्यात टाटा कंपनीने जलविद्युत प्रकल्पासाठी धरण बांधण्याचा निर्णय घेतला .या प्रकल्पामुळे अनेक गावांचे विस्थापन होणार होते आणि शेतकरी-आदिवासी आपल्या जमिनी, घरे व उपजीविकेपासून वंचित होणार होते .या अन्यायाविरोधात सेनापती बापट यांच्या नेतृत्वाखाली मुळशी सत्याग्रह उभा राहिला.

या सत्याग्रहाचे सर्वात मोठे महत्त्व म्हणजे तो शेतकरी आणि विस्थापितांच्या हक्कांचा आवाज बनला .ब्रिटिश काळात मोठ्या उद्योगांसाठी सामान्य जनतेच्या हक्कांकडे दुर्लक्ष केले जात होते .मुळशी सत्याग्रहाने जमीन ही केवळ मालमत्ता नसून ती शेतकऱ्यांच्या जीवनाचा आधार आहे, हा मुद्दा ठळकपणे मांडला .योग्य मोबदला, पुनर्वसन आणि न्याय्य वागणूक मिळावी, ही मागणी या आंदोलनातून पुढे आली.

मुळशी सत्याग्रहाचे आणखी एक महत्त्व म्हणजे तो गांधीवादी अहिंसक लढ्याचा प्रभावी नमुना ठरला .सेनापती बापट

यांनी सत्य, अहिंसा आणि त्यागाच्या मार्गाने आंदोलन चालवले .अनेक अडचणी, अटक, छळ असूनही सत्याग्रहींनी हिंसेचा मार्ग स्वीकारला नाही .त्यामुळे सामान्य जनतेत आंदोलनाबद्दल सहानुभूती निर्माण झाली

**शेतकरी चळवळीचा प्रारंभिक टप्पा :-** सेनापती बापट यांच्या शेतकरी चळवळीचा प्रारंभिक टप्पा हा त्यांच्या क्रांतिकारी राष्ट्रवादी विचारांपासून सामाजिक-आर्थिक प्रश्नांकडे झालेल्या वैचारिक संक्रमणातून घडून आला .स्वातंत्र्यलढ्यातील सहभाग, कारावासातील अनुभव, रशियन क्रांतीचा प्रभाव आणि महात्मा गांधींच्या असहकार चळवळीमुळे बापटांचे लक्ष ग्रामीण समाजातील शोषणाकडे वळले .१९२० च्या दशकात त्यांनी महाराष्ट्रातील ग्रामीण भागात प्रत्यक्ष प्रवास करून शेतकऱ्यांच्या समस्या—जमिनीवरील अन्यायकारक महसूल, सावकारांचे शोषण, बेदखली, वेठबिगारी व दुष्काळी परिस्थिती—यांचा सखोल अभ्यास केला .या अनुभवातून शेतकरी हा औपनिवेशिक राज्यव्यवस्थेचा आणि भांडवली-सावकारी व्यवस्थेचा सर्वाधिक बळी आहे, ही जाणीव त्यांच्या विचारांत ठाम झाली .या प्रारंभिक टप्प्यात बापटांनी शेतकऱ्यांमध्ये जागृती निर्माण करण्यावर भर दिला; सभा, व्याख्याने, पत्रके व प्रत्यक्ष संवाद यांच्या माध्यमातून त्यांनी शेतकऱ्यांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून दिली आणि संघटनेची गरज पटवून दिली .गांधीवादी अहिंसा व सत्याग्रहाच्या तत्त्वांवर आधारित कर न भरता विरोध, अन्यायकारक वसुलीविरुद्ध शांततामय प्रतिकार अशा उपायांची मांडणी त्यांनी केली .त्यामुळे हा टप्पा मोठ्या आंदोलनांपेक्षा वैचारिक पायाभरणी, संघटनात्मक तयारी आणि शेतकरी चळवळीला दिशा देणारा महत्त्वाचा प्रारंभिक काळ ठरतो.

**औद्योगिक विकास विरुद्ध शेतकरी -:** सेनापती बापट यांच्या नेतृत्वाखाली औद्योगिक विकासाच्या नावाखाली शेतकरी व स्थानिक जनतेच्या हक्कांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध उभी राहिलेली चळवळ ही त्यांच्या सामाजिक संघर्षाची महत्त्वाची बाजू होती . स्वातंत्र्यानंतर राज्यपुरस्कृत औद्योगिकीकरण, धरणे, कारखाने आणि वसाहती उभारणीसाठी मोठ्या प्रमाणावर शेतजमिनी संपादित केल्या जात होत्या .या प्रक्रियेत शेतकऱ्यांना अपुरी भरपाई, पुनर्वसनाचा अभाव आणि उपजीविकेचा ऱ्हास सहन करावा लागत होता .सेनापती बापट यांनी या औद्योगिक विकासाच्या एकांगी, भांडवली आणि शोषणात्मक स्वरूपावर तीव्र टीका केली आणि "विकास कोणासाठी?" हा मूलभूत प्रश्न उपस्थित केला .त्यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांमध्ये जागृती निर्माण झाली; सभा, मोर्चे, सत्याग्रह आणि उपोषण यांच्या माध्यमातून त्यांनी जमीन संपादन, जबरदस्तीची विस्थापने आणि अन्यायकारक धोरणांविरुद्ध संघटित प्रतिकार उभा केला .बापटांची भूमिका औद्योगिकीकरणाच्या पूर्ण विरोधाची नसून, शेतकरी हित, मानवी प्रतिष्ठा आणि सामाजिक न्याय यांना केंद्रस्थानी ठेवणाऱ्या समतोल विकासाची होती .त्यामुळे औद्योगिक विकास विरुद्ध शेतकरी चळवळ ही केवळ आर्थिक संघर्ष न राहता विकासाच्या संकल्पनेवर प्रश्नचिन्ह उभे करणारी वैचारिक आणि नैतिक चळवळ ठरली.

## ७ .सामाजिक योगदान Social Contribution

### ७.१ शेतकरी व ग्रामीण समाजासाठी कार्य :-

सेनापती बापट यांनी शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी सातत्याने आवाज उठवला .त्यांनी शेतकरी हा राष्ट्राचा कणा आहे, असे प्रतिपादन केले .ग्रामीण भारताचा विकास झाल्याशिवाय खरे स्वातंत्र्य मिळू शकत नाही, हा त्यांचा ठाम विश्वास होता .त्यासाठी त्यांनी प्रामाणिक पणे आपले योगदान दिले व या चळवळींचे नेतृत्व केले.

### ७.२ सामाजिक समता व नैतिक मूल्ये :-

**सामाजिक समतेविषयी विचार**

सेनापती बापट यांचा ठाम विश्वास होता की खरे स्वातंत्र्य तेव्हाच मिळेल, जेव्हा समाजातील जातिभेद, अस्पृश्यता व विषमता नष्ट होतील .त्यांनी अस्पृश्यता ही मानवी मूल्यांना काळीमा फासणारी प्रथा असल्याचे स्पष्टपणे मांडले .सर्व माणसे समान आहेत, कुणीही जन्माने श्रेष्ठ किंवा कनिष्ठ नाही, ही भूमिका त्यांनी ठामपणे घेतली .गरीब, कामगार, शेतकरी आणि वंचित घटकांच्या हक्कांसाठी त्यांनी आवाज उठवला .सामाजिक न्याय आणि समतेशिवाय राष्ट्राची प्रगती अशक्य आहे, असे त्यांचे मत होते.

**नैतिक मूल्यांविषयी विचार**

नैतिक मूल्ये ही व्यक्ती आणि समाजाच्या उन्नतीची खरी शक्ती आहेत, असे सेनापती बापट मानत. सत्य, अहिंसा,

प्रामाणिकपणा, त्याग, शिस्त आणि साधेपणा ही मूल्ये त्यांनी स्वतःच्या जीवनात आचरणात आणली .राजकारण हे नैतिकतेवर आधारित असावे, सत्ता व स्वार्थासाठी नसावे, असे त्यांचे स्पष्ट मत होते .त्यांनी साधे जीवन जगून सार्वजनिक जीवनात पारदर्शकता आणि नैतिक शुद्धता जपली.

**सामाजिक व नैतिक परिवर्तनाचा आग्रह**

सेनापती बापट यांच्या मते, सामाजिक समता आणि नैतिक मूल्ये या परस्परपूरक आहेत .नैतिकतेशिवाय समता टिकत नाही आणि समतेशिवाय नैतिक समाज घडत नाही .त्यामुळे त्यांनी समाजसुधारणा, स्वदेशी, खादी, श्रमप्रतिष्ठा आणि लोकशाही मूल्यांचा पुरस्कार केला.

**८ .स्वातंत्र्योत्तर काळातील भूमिका:-**

स्वातंत्र्यानंतरही सेनापती बापट सक्रिय राहिले .त्यांनी सत्तेपासून दूर राहून समाजसेवेचा मार्ग निवडला त्यांनी  राजकीय पदे नाकारून त्यांनी आदर्श लोकनेत्याचे उदाहरण घालून दिले.

**९ .भारताच्या जडणघडणीत सेनापती बापट यांचे स्थान**

भारताच्या राष्ट्रनिर्मितीत सेनापती बापट यांचे योगदान पुढीलप्रमाणे महत्त्वाचे ठरते  शेतकरी चळवळीचे आद्य नेतृत्व , अहिंसक संघर्षाचे प्रभावी उदाहरण, नैतिक व मूल्याधिष्ठित राजकारणाचा पुरस्कार

**१०.निष्कर्ष Conclusion :-**

सेनापती बापट हे भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व होते .त्यांनी क्रांतिकारक आणि गांधीवादी अशा दोन्ही प्रवाहांचा अनुभव घेतला .त्यांच्या जीवनातून त्याग, धैर्य, सामाजिक जाणीव आणि नैतिक राजकारण यांचे दर्शन घडते .भारताच्या जडणघडणीत त्यांनी दिलेले योगदान आजही प्रेरणादायी आहे .त्यामुळे त्यांचे कार्य केवळ ऐतिहासिकच नव्हे तर वर्तमानकाळातही मार्गदर्शक ठरते.

**संदर्भ साहित्य References :-**

१. फडके, य .द. सेनापती बापट : जीवन व कार्य. पुणे : श्रीविद्या प्रकाशन.
२. देशमुख, अ. भारतीय स्वातंत्र्य चळवळ. मुंबई : पॉप्युलर प्रकाशन.
३. Bapat, P. M. Collected Works of Senapati Bapat. Pune.
४. Wikipedia – Pandurang Mahadev Bapat.
५. लोकसत्ता विशेष लेख : सेनापती बापट.
६. Navbharat Times – Mulshi Satyagraha Special Articles.
७. केळकर, ना .ग. सेनापती बापट : जीवन आणि कार्य. पुणे : मौज प्रकाशन.
८. फडके, य .दि. महाराष्ट्रातील सामाजिक व राजकीय चळवळी. पुणे : श्रीविद्या प्रकाशन.
९. देशपांडे, गो .पां. महाराष्ट्रातील समाजवादी चळवळ. मुंबई : ग्रंथाली.
१०. पानसरे, गोविंद. शेतकरी आणि कामगार चळवळीचा इतिहास. कोल्हापूर : साधना प्रकाशन.
११. जोगळेकर, शरद. स्वातंत्र्य चळवळीतील क्रांतिकारी प्रवाह. पुणे : डायमंड पब्लिकेशन्स.